POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक


# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक -५१ ● मुंबई, मंगळवार,२३ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA





Sharad Navratri Colors 2025

| | |
|---|---|
| Sep 22, Monday | White |
| Sep 23, Tuesday | Red |
| Sep 24, Wednesday | Royal Blue |
| Sep 25, Thursday | Yellow |
| Sep 26, Friday | Green |
| Sep 27, Saturday | Grey |
| Sep 28, Sunday | Orange |
| Sep 29, Monday | Peacock Green |
| Sep 30, Tuesday | Pink |

## गरब्यांमध्ये फक्त हिंदूंनाच प्रवेश, प्रत्येकाच्या कपाळी टिळा लावा; विश्व हिंदू परिषदेची भूमिका

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

नवरात्र उत्सवादरम्यान होत असलेल्या गरब्यांमध्ये केवळ हिंदूंनाच प्रवेश द्यावा. गरबा आयोजकांनी प्रत्येकाला आधार कार्ड पाहूनच प्रवेश द्यावा, अशी भूमिका विश्व हिंदू परिषदेने घेतली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या भूमिकेचे समर्थन केले. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी या भूमिकेला तीव्र विरोध दर्शविला आहे.

विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्रीराज नायर यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, गरबा हा केवळ एक नृत्य प्रकार नाही तर ती दुर्गेची केलेली पूजा आहे आणि मूर्तिपूजेवर विश्वास नाही अशा लोकांना गरबा सुरू असताना प्रवेश दिला जाऊ नये. विविध मंडळांना आम्ही तशी सूचना केलेली आहे. प्रवेशाच्या ठिकाणी प्रत्येकाचे आधार कार्ड तपासून मगच प्रवेश द्या.

गरबा खेळायला वा बघायला जे येतील त्यांचे स्वागत प्रवेशद्वारावरच टिळा लावून करा म्हणजे ते हिंदूच असल्याचे स्पष्ट होईल. नायर यांनी असेही स्पष्ट केले की, विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांची गरबा उत्सवांच्या ठिकाणी नजर असेल. ज्यांची देवीवर श्रद्धा-भक्ती नाही, त्यांना आत येऊ दिले जाणार नाही.




### सर्वस्वी अधिकार संयोजकांचा : बावनकुळे

बावनकुळे म्हणाले, की पोलिसांच्या परवानगीने गरब्याचे आयोजन करण्यात आले असेल तर तेथे कोणाला प्रवेश द्यावा आणि कोणाला देऊ नये याचा अधिकार गरबा आयोजकांना आहे. वडेट्टीवार यांनी मात्र विश्व हिंदू परिषदेची ही भूमिका उगाच समाजात तेढ निर्माण करणारी असल्याची प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, राजकीय फायद्यासाठी समाजा–समाजात आग लावण्याचे काम विश्व हिंदू परिषद करत आहे. समाजात या निमित्ताने अस्थिरता निर्माण करण्याचा त्यांचा हेतू आहे.

### ‘हा उत्सव हिंदूंचाच; इतर धर्मीयांनी त्यात दखल देऊ नये’

प्रदेश भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन हे विहिंपच्या भूमिकेचे समर्थन करताना म्हणाले, की गरबा हा हिंदूंचा उत्सव आहे आणि इतर धर्मीयांनी त्यात दखल देण्याचे काहीही कारण नाही. मंत्री नितेश राणे म्हणाले, की गरब्यासाठी येणारे केवळ हिंदूच असले पाहिजेत. कारण, या उत्सव काळात फसवून लव्ह जिहादचे प्रकार घडतात. त्यामुळेच दांडियाच्या ठिकाणी केवळ हिंदूच गेले पाहिजेत ही सकल हिंदू समाजाची भावना आहे. उद्धवसेनेचे नेते खा. संजय राऊत यांनी विहिंपच्या भूमिकेला विरोध दर्शविला. ते म्हणाले की, अशी भूमिका घेणाऱ्यांचा देश वेगळा असेल. त्यांना वेड लागले आहे. मग मुस्लीम देशांना नरेंद्र मोदी भेट देणार नाहीत का? आपल्या देशात मुस्लीम राष्ट्रप्रमुख येणार नाहीत असे घडणार आहे का? असा सवाल राऊतांनी केला.


## राज्यात २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान पावसात वाढ होण्याची शक्यता

### शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठेवावीत

**■मुंबई । प्रतिनिधी,**

२४ सप्टेंबरला बंगालच्या उपसागरावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार असून २८ तारखेपर्यंत तो राज्यात येण्याची शक्यता आहे. या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांमध्ये २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान ढगाळ हवामान आणि पावसात वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या आठवड्यात पाऊस परत सक्रिय होणार आहे, ज्यामुळे किमान ३० सप्टेंबरपर्यंत तरी राज्यातून पाऊस निरोप घेण्याची शक्यता नाही. सध्याच्या हवामानाच्या




अंदाजानुसार २२ ते २५ सप्टेंबर दरम्यान राज्यातील विविध भागांमध्ये मेघ गर्जनेसह वादळी पाऊस अपेक्षित आहे, जो प्रामुख्याने दुपारनंतर पडेल.

कमी दाबाच्या पट्ट्याचा प्रभाव 26 तारखेपासून जाणवण्याची शक्यता आहे. यादिवशी विदर्भ आणि मराठवाड्यातील पूर्व आणि दक्षिणेकडे असलेल्या भागांमध्ये दुपारनंतर पावसात वाढ होण्याची शक्यता आहे. 27 तारखेला विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पावसात वाढ होऊ शकते, आणि यातील काही भागांमध्ये मुसळधार पाऊसदेखील पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. 28 तारखेला राज्यातील पश्चिम भागांमध्ये पावसाचा जोर कायम राहू शकतो.

शेतकऱ्यांनी हवामानाच्या या अंदाजानुसार शेतीचे नियोजन करावे. काढणी केलेली पिके पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावीत, असे आव्हान कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## धारावीत रस्ता शोधायचा तरी कुठे?; अवैध पार्किंग, बेकायदेशीर फेरीवाल्यामुळे मार्गात अडथळ्यांची शर्यत



**■मुंबई । प्रतिनिधी,**

सायन स्थानकाजवळील पूल नूतनीकरणासाठी बंद केल्याने संत रोहिदास मार्गावरील वाहतूक लोकमान्य टिळक रुग्णालयाजवळ असलेल्या पुलावरून वळविण्यात आली. त्यामुळे वाहतूककोंडीत भर पडली आहे. प्रवासासाठी लागणाऱ्या वेळेत २५ ते ३० टक्क्यांची वाढ झाली.

माटुंगा लेबर कॅम्पकडे जाणारा रस्ता, धारावी पोलिस स्थानकाकडे जाणारा ९० फिट रोड आणि टी जंक्शनकडे जाणारा ६० फिट रोड यांना जोडणाऱ्या मुख्य चौकातीही हा जाच वाढला आहे. मालवाहू वाहनांची वाढलेली वर्दळ, अवैध पार्किंग, फेरीवाले, रस्त्यांची दुर्दशा, कचराकुंड्या, पदपथाच्या अभावाने मुख्य रस्त्यावर चालणारे पादचारी आदींमुळे धारावीमधील वाहतूककोंडीची समस्या वाढत आहे. येथील मुख्य रस्त्यांप्रमाणेच ९० फिट रोड, धारावी मेनरोडसारख्या अंतर्गत रस्त्यांची बिकट अवस्था असल्याने धारावी कोंडीने त्रस्त आहेत. धारावीतील पाच हजार लघुउद्योगांच्या मालाची ने-आण करणाऱ्या हातगाड्या, मालवाहू गाड्यांच्या वाहतुकीमुळे रस्ते गजबजलेले असतात. मात्र येथील प्रत्येकाला कोंडीचा सामना करावा लागत आहे.

### पार्किंगमध्ये हरवले रस्ते

धारावीत दुचाकी रस्त्यावरच पार्किंग कराव्या लागतात. टॅक्सी पार्किंगही रस्त्यावरच होते. निसर्ग उद्यानाला लागून असलेल्या धारावी- वांद्रे लिंक रोडवर पालिकेच्या कचरा वेचणाऱ्या गाड्या पार्क असतात. ९० फिट आणि ६० फिट रोडला त्यांच्या रुंदीमुळे ही नावे पडली. मात्र अनधिकृत पार्किंग आणि फेरीवाल्यांसह इतर समस्यांमुळे हे रस्ते वाहतुकीसाठी २० फूट उपलब्ध आहेत.


### केवळ २० किलोमीटरचे रस्त्यांचे जाळे

शहर विकास आराखड्यानुसार धारावीत सुमारे २० किलोमीटरचे रस्त्यांचे जाळे आहे. येथील मुख्य रस्ता १.४७ किमी तर सायन-धारावी रस्ता २ किमीचा आहे. इतर रस्ते याहून छोटे आहेत. येथील लोकसंख्येची घनता लक्षात घेता धारावीत प्रति व्यक्ती केवळ ०.०२ मीटर रस्ता उपलब्ध आहे.

### प्रस्तावित काय आहे?

धारावी पुनर्विकास प्रकल्पात रस्त्यांचा कायापालट होईल. शासनाला सादर मास्टर प्लॅनमध्ये ही बाब अधोरेखित आहे. मुख्य रस्त्यांच्या रुंदीकरणासह १२५ मीटर अंतरावर परस्परांना छेदणाऱ्या अंतर्गत रस्त्यांचे जाळे तयार केले जाईल. सार्वजनिक वाहतुकीसह सायकलस्वार आणि पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था प्लॅनमध्ये प्रस्तावित आहे.

## नरिमन पॉइंटपासून मिरा-भाईदर गाठा अवघ्या अर्ध्या तासात; मिठागराची जमीन हस्तांतरित, मोठा अडथळा दूर



**■मुंबई । प्रतिनिधी,**

नरिमन पॉइंटवरून मिरा-भाईंदर हे अंतर कापताना वाहतूककोंडी, खड्ड्यांसह अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यामुळे पावणेदोन तासांहून अधिक वेळ खर्ची पडतो. मात्र, हे अंतर अवघ्या अर्ध्या तासात कापता येणार आहे. केंद्रीय मिठागार मंत्रालयाने आपली जमीन राज्य सरकारला हस्तांतरित केल्यामुळे दहिसर ते भाईंदर हा महामार्ग तयार करण्यातील मोठा अडथळा दूर झाला असून कोस्टल रोडमार्गे नरिमन पॉईंटहून मिरा-भाईंदरला सुसाट जाता येणार आहे. दहिसर ते भाईंदर हा महामार्ग ३ वर्षांत तयार होईल. त्यानंतर नरिमन पॉइंटहून मिरा-भाईंदर कोस्टलमार्गे अर्ध्या तासात कापता येईल, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. राज्य शासन आणि केंद्रीय मिठागार मंत्रालयाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर दहिसर- भाईंदर या ६० मीटर रस्त्याच्या मार्गातील ५३.१७ एकर जागा केंद्रीय मिठागार मंत्रालयाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यास मंजुरी दिली. मुंबई महापालिकेच्या माध्यमातून कोस्टल रोड हा उत्तनपर्यंत जाणार आहे. तेथून दहिसर-भाईंदर हा ६० मीटर रुंदीचा रस्ता मीरा रोड येथील सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत येऊन तिथून वसई विरार या दोन शहराला जोडला जाणार आहे. या रस्त्याची निविदा यापूर्वीच काढली आहे. हे काम एल अँड टी ही कंपनी करणार असून, पुढील तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण होईल. त्यासाठी येणारा तब्बल ३ हजार कोटी रुपयांचा खर्च मुंबई महापालिका करणार आहे.

### कोस्टल रोडचा समुद्र किनाऱ्याला धोका नाही

कोस्टल रोड हा उत्तन येथून समुद्रकिनाऱ्यावरून विरारकडे जाणार होता. परंतु, त्यामुळे मासेमारीवर आणि पर्यायाने उपजीविकेवर परिणाम होण्याच्या भीतीने त्याला कोळी बांधवांनी कडाडून विरोध केला होता. प्रताप सरनाईक यांनी कोळी बांधवांची ही व्यथा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे मांडली आणि त्यांच्या मागणीला मान्यता मिळवली. त्यामुळे हा मार्ग समुद्रकिनाऱ्यावरून जाण्याऐवजी उत्तन ते दहिसर आणि तेथून मीरा-भाईंदरमार्गे वसई विरारकडे जमीनमार्गे जाणार आहे.

### मार्गातील अडथळा दूर

जमिन हस्तांतरीत झाल्याने दहिसर ते भाईंदर आणि पुढे वसई-विरारकडे जाणारा रस्ता तयार करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

## यंदा 'मुहूर्त ट्रेडिंग'च्या वेळेत बदल; दुपारीच होणार खरेदी-विक्री!




**■मुंबई । प्रतिनिधी,**

दिवाळी निमित्त भारतीय शेअर बाजारातील सर्वात महत्त्वाच्या 'मुहूर्त ट्रेडिंग' सत्राचा यंदाचा वेळ बदलण्यात आला आहे. नॅशनल स्टॉक एक्सचेंज (NSE) ने जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार, यंदा २१ ऑक्टोबर २०२५ रोजी होणारे विशेष सत्र सायंकाळी ऐवजी दुपारी आयोजित करण्यात आले आहे. गेल्या वर्षी, २०२४ मध्ये हे सत्र सायंकाळी ६:०० वाजता सुरू झाले होते, मात्र यंदा वेळेत बदल करण्यात आला आहे.

मुहूर्त ट्रेडिंगचे वेळापत्रक

यंदाचे 'मुहूर्त ट्रेडिंग' सत्र २१ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित केले आहे.

प्री-ओपनिंग सत्र: दुपारी १:३० वाजता सुरू होईल.

बाजाराची सुरुवात: दुपारी १:४५ वाजता.

बाजाराचे बंद होणे: दुपारी २:४५ वाजता.

मुहूर्त ट्रेडिंगचे महत्त्व

'मुहूर्त ट्रेडिंग' हे भारतीय संस्कृती आणि परंपरेचा एक भाग आहे. भारतीय पंचांगानुसार दिवाळी पाडव्यापासून हिंदूंचे नवीन आर्थिक वर्ष सुरू होते. या शुभ मुहूर्तावर केलेली गुंतवणूक समृद्धी आणि चांगल्या भविष्यासाठी महत्त्वाची मानली जाते.

मुंबई शेअर बाजार (BSE) ने १९५७ पासून या परंपरेची सुरुवात केली, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंज (NSE) वर १९९२ पासून हे सत्र सुरू झाले. या एका तासाच्या विशेष सत्रात अनेक गुंतवणूकदार आपल्या नव्या आर्थिक प्रवासाला सुरुवात करतात. यंदा हा ऐतिहासिक सोहळा दुपारीच पार पडणार आहे.

## मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आला उच्च न्यायालयाचा निर्णय

**■मुंबई । प्रतिनिधी,**

मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय आला आहे. यामुळे हैदराबाद गॅझेटियरच्या मदतीने मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या शासनमान्य प्रक्रियेतील अडथळे दूर झाले आहेत.

फडणवीस सरकारने सप्टेंबर महिन्यात हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदी आणि इतर पूरक कागदपत्रांची छाननी करुन अर्ज करणाऱ्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत एक शासननिर्णय काढल्याचे सांगितले. याच सरकारी निर्णयाची प्रत काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे यांना देण्यात आली. जरांगेंनी प्रसारमाध्यमांसमोर दाखवलेल्या शासननिर्णयाला अनेक



ओबीसी संघटनांनी आव्हान दिले होते. या याचिकांवर आज सुनावणी घेण्यात येण्याची शक्यता होती. मात्र न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे व न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने तांत्रिक कारणावरून या याचिकांवर सुनावणी करण्यास आज नकार दिला आहे. त्यामुळे आता या याचिका मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर व न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणीला जाण्याची शक्यता आहे. जोपर्यंत पुढील निर्णय येत नाही तोपर्यंत मराठा आरक्षण सुरक्षित आहे. जीआरनुसार कागदपत्रे तपासून आणि हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदी बघून योग्य व्यक्तींना कुणबी प्रमाणाक्ष दिले जाईल.

कुणबी प्रमाणपत्रांद्वारे मराठ्यांचे ओबीसीकरण सुरू असल्याचा आरोप ओबीसींमधून मराठ्यांवर होत आहे. हा प्रकार ओबीसींवर अन्याय करणारा असल्याची भूमिका अनेक ओबीसी नेत्यांनी घेतली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने काढलेल्या जीआरला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. पण तांत्रिक कारणांमुळे मुंबई उच्च न्यायालयने सोमवारी सुनावणी घेण्यास नकार दिला. यामुळे सध्या शासनाचा जीआर सुरक्षित आहे.

## महालक्ष्मी मंदिरात नवरात्री उत्सवासाठी भाविकांची गर्दी

**■कोल्हापूर । प्रतिनिधी,** :

११ दिवसांचा नवरात्रोत्सव आज 'करवीर निवासिनी' अंबाबाई, श्री महालक्ष्मी मंदिरात 'घटस्थापना'सह उत्साहात सुरू झाला. 'श्री पूजक' माधव मुनिश्वर आणि मुख्य पुरोहित किरण लाटकर यांनी महालक्ष्मीच्या मूर्तीवर अभिषेक केला, त्यानंतर पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडी यांनी पूजा केली आणि नंतर दहा दिवसांच्या नवरात्रोत्सवासाठी 'घटस्थापना' आणि 'अलंकृत' (प्रतिमात्मक) पूजा केली.

आज श्री कमलदेवीची पूजा, त्यानंतर श्री बगलामुखी (२३ सप्टेंबर), श्री तारा देवी (२४ सप्टेंबर), श्री मांतंगी (२५ सप्टेंबर), श्री भुवनेश्वरी देवी (२६ सप्टेंबर), हत्तीवर पूजा (२७ सप्टेंबर), श्री षोडशी त्रिपुरासुंदरी देवी (२८ सप्टेंबर), श्री महाकाली (२९ सप्टेंबर), श्री महिषासुरमर्दिनी (३० सप्टेंबर), श्री भैरवी (१ ऑक्टोबर), आणि विजयदशमी दसऱ्याच्या दिवशी, श्री महालक्ष्मीची रथातून (२ ऑक्टोबर) मिरवणूक काढली जाईल. श्री महालक्ष्मी मंदिर 'दक्षिण काशी' म्हणून प्रसिद्ध आहे, देशातील १८ 'महा शक्तीपीठां'पैकी एक आहे आणि राज्यातील साडेतीन 'पीठां'पैकी एक 'पूर्ण पीठ' आहे.



चालुक्य काळात बांधलेले, हे मंदिर २७,००० चौरस फूट क्षेत्रात पसरलेले, पूर्णपणे काळ्या दगडाचे एक पुरातत्वीय आश्चर्य आहे. महालक्ष्मी मंदिराला ४५ फूट उंच मुख्य कळस आहे, ज्याची उंची 'सुपरस्ट्रक्चर'पर्यंत ३५ फूट आहे आणि ते पूर्व-पश्चिम ३५० फूट आणि उत्तर-दक्षिण २२५ फूट पसरलेले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांच्या मते, राज्य आणि शेजारच्या कर्नाटक आणि आंध्र प्रदेशसारख्या राज्यांमधून सुमारे २५ लाख भाविक देवीचे 'दर्शन' घेण्यासाठी येण्याची अपेक्षा आहे. बंदोबस्तासाठी एकूण ७०० पोलीस कर्मचारी आणि २००० हून अधिक 'होम गार्ड' तैनात करण्यात आले आहेत. महाद्वार रोडवर १२२ 'सीसीटीव्ही' कॅमेरे आणि मंदिराच्या परिसरात ८२ कॅमेरे लावण्यात आले आहेत. तर शहराच्या मुख्य ठिकाणी १५ मोठे स्क्रीन थेट 'दर्शन' देण्यासाठी लावण्यात आले आहेत.

कोल्हापूर महानगरपालिकेने ताराबाई रोडवर ७५ गाड्या आणि २५० दुचाकींसाठी नवीन बांधलेले बहुमजली कार पार्किंग आणि दुचाकी पार्किंगचे उद्घाटन केले. कोल्हापूर महानगर परिवहनने आज सकाळी जिल्ह्याच्या नऊ 'दुर्गां'चे दर्शन देण्यासाठी आपली विशेष 'नवदुर्गा-दर्शन' बस सेवा सुरू केली आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# गुंडांवर पोलिसांची जरब हवी



नव्वदच्या दशकात मुंबई आणि ठाण्यात गुन्हेगारी टोळ्यांनी उच्छाद मांडला होता. ठाण्यात मंचेकर, मुंबईत छोटा राजन, दाऊद, अरुण गवळी, अमर नाईक या टोळ्यांमध्ये रस्त्यांवर रक्तपात वाढला असताना पोलिसांनी गुन्हेगारी कारवाया संपवण्यासाठी मुंबईत प्रदीप शर्मा, दया नायक, विजय साळसकर तर ठाण्यात रवींद्र आंग्रे अशी नव्या दमाच्या अधिकारी तरुणांची फौज मैदानात उतरवली होती. त्यातून गुन्हेगारांना त्यांच्याच भाषेत उत्तर मिळू लागल्याने गँगवॉर संपुष्टात आले. सुरेश मंचेकर, फिरोज कोकणी यांच्या गुन्हेगारी कारवायांना ठाणे पोलिसांचे रवींद्र आंग्रे कर्दनकाळ ठरले होते. तत्कालीन राज्य सरकार पोलिसांच्या पाठीशी राहिल्याने मुंबईतून टोळीयुद्ध संपवण्यात पोलीस आणि गृहविभागाला यश आले. मुंबईतील १९९२-९३ च्या सांप्रदायिक दंगलीनंतर मुंबईत साखळी बॉम्बस्फोटांसाठी पार्श्वभूमी तयार झाली होती. गुन्हेगारी टोळ्यांच्या वेळीच मुसक्या आवळल्या न गेल्याने १२ मार्च १९९३ मध्ये पुढे मुंबईतील बॉम्बस्फोटासाठी पूरक स्थिती तयार झाली. गुन्हेगारी रक्तपात सामान्यांच्या घरापर्यंत येऊन पोहचल्याने पोलिसांनी त्यानंतर मुंबईतून गुन्हेगारीचा बिमोड करण्याचे ठरवले. आज महाराष्ट्रात विशेष करून बीड, सोलापूर, ठाणे, पुण्यात रक्तरंजीत सूडाने पेटलेल्या गुन्हेगारी टोळ्यांनी डोकी वर काढली आहेत. या गुन्हेगारी टोळ्यांना राजकीय वरदहस्त मिळत असल्याच्या आरोपात तथ्य असावे, अन्यथा या कारवाया एवढ्या मोठ्या कालावधीत सातत्याने सुरू राहिल्या नसत्या.

आयुष कोमकरच्या हत्येनंतर पुण्यात आंदेकर विरुद्ध कोमकर टोळीयुद्धाचा भडका उडण्याची शक्यता आहे. मागील काही राजकीय घडामोडींमध्ये पोलिसांवरील तणाव प्रचंड वाढला आहे. केवळ राजकीय वापरासाठीच आणि राजकीय नेत्यांच्या सुरक्षेसाठीच पोलिसांचा उपयोग होत आहे का, असा प्रश्न सामान्यांना पडत आहे. राजकीय आंदोलने आणि धार्मिक, जातीय ताणतणावाच्या बंदोबस्तातच अर्धेअधिक पोलीस बळ खर्ची पडत आहे. अशा परिस्थितीत पोलीस दलाच्या कारवायांमध्ये राजकीय ढवळाढवळ होत असल्याने पोलिसांचे मनोधैर्य कमी होत आहे. अशा परिस्थितीत एकीकडे राजकीय दबाव आणि दुसरीकडे कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी अशा दोन जबाबर्दायांमध्ये पोलिसांना त्यांचे मानसिक शारीरिक आरोग्य संतुलन ठेवावे लागत आहे. या बंदोबस्त आणि सरकारी सोपस्कारातच पोलीस दलाचा अर्धाअधिक वेळ जात असल्याने पोलिसांचे पुरेसे भय गुन्हेगारांना राहिलेले नाही. वसई रेल्वे स्टेशनवर एका व्यक्तीने पोलिसांवर केलेली अरेरावीचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. पोलिसांना थेट आव्हानाची भाषा समाजमाध्यमांवर गुन्हेगारांकडून केली जात आहे. अशावेळी कारवायांसाठी पुरेशी मोकळीक पोलिसांना देण्याची गरज आहे. या गुन्हेगारी टोळ्यांना मिळणारी राजकीय रसद, अंमलीपदार्थ व्यवहार, जमिनव्यवहार, खंडणीवसुली आणि बेकायदा कामांतून येणारा पैसा रोखण्याची गरज आहे. भूमाफीयांशी असलेले गुन्हेगारांचे राजकीय लागेबांधे नवीन नाहीत, त्यातून येणारा पैसा आणि राजकीय आशीवादार्मुळे गुन्हेगारी टोळ्यांचा उच्छाद ठाणे, पुण्यात वाढला आहे. पुण्यामध्ये मागील २० वर्षात अमली पदार्थांशी संबंधित गुन्हेगारी घडामोडींना उत आला आहे. बीडमधील गुन्हेगारी कारवायांनी रोजच्या रोज वर्तमानपत्रांचे रकाने आणि वृत्तवाहिन्यांचा प्राईम टाईम भरून निघत आहे. ठाण्यातील उल्हासनगर, अंबरनाथमध्ये गुन्हेगारी टोळ्यांकडून वाहनांना आगी लावणे, हत्यारे घेऊन रस्त्यात दहशत माजवण्याचे प्रकार वाढले आहेत. तिकडे विदर्भ नागपूरमध्ये बेकायदा व्यवसाय आणि जमीन व्यवसायांशी संबंधित गुन्हेगारी कारवाया वाढल्या आहेत. महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्ह्यांमध्ये छोट्यामोठ्या टोळ्या सक्रीय झाल्या आहेत. सोलापूरमध्ये अनमोल केवटे यांची रस्त्यातच शनिवारी हत्या झाली. पुण्यातील नाना पेठेत झालेल्या टोळीयुद्धात 19 वर्षीय आयुष कोमकरची निर्दयपणे हत्या करण्यात आली होती. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी आंदेकर टोळीने आयुषवर गोळीबार केला. तब्बल 12 गोळ्या झाडल्या, पैकी नऊ गोळ्या आयुषला लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. आयुष हा वनराज आंदेकर खून प्रकरणातील आरोपी गणेश कोमकर यांचा मुलगा असल्याने टोळीने सूड उगवला होता. ही घटना थंड होत नाही तोच पुण्यात किरकोळ कारणाने गोळीबाराची घटना नुकतीच घडली. मध्यरात्री कोथरूड परिसरात हा गोळीबार झाला. कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या चार जणांच्या टोळीकडून गाडीला पुढे जाण्यासाठी साईड न दिल्याने या किरकोळ कारणाने हा गोळीबार झाल्याची माहिती आहे. यात एकजण जबर जखमी झाला आहे, सामान्य नागरिकांवर गोळ्या चालवण्यासाठी या गुन्हेगारी टोळ्यांपर्यंत घातक पिस्तुले, अग्निशस्त्रे कशी येतात हा प्रश्न आहे. तर गुन्हेगारीने आधीच बदनाम झालेल्या बीडच्या अंबोजोगाई भागात जुन्या प्रकरणातून एका व्यापार्यावर लोखंडी कत्तीने वार केल्याची घटना घडली आहे. यावेळी दोन हल्लेखोरांनी या व्यापार्याला 'तुझा मुळशी पॅटर्न' करतो अशी धमकी देऊन लोखंडी कत्तीने वार केला, वेळीच बचाव केल्याने हा व्यापारी वाचला. गोळीबारानंतर कोथरुडमध्ये पोलिसांनी गुंडांची धिंड काढली आहे. अशीच जरब इतर गुन्हेगारांना बसवण्याची गरज आहे. एखादा गुंड तरुंगातून सुटल्यावर त्याचा सत्कार करून मिरवणूक काढण्याच्या प्रकारांना आळा घालायला हवा. पोलिसांची धास्ती गुंडांना बसणे गरजेचे आहे, नाही तर सामन्य माणसांचे जगणे अवघड होऊन बसेल.

# आरक्षणाच्या राजकारणात शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष



अतिवृष्टी व पुरामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, खरीप हंगाम पूर्णतः उद्ध्वस्त झाला आहे. तरी सरकारकडून मदतीचे ठोस निर्णय झालेले नाहीत. उलट आरक्षणाच्या राजकारणात शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्रासह सर्वत्र अतिवृष्टी आणि पुराचा प्रचंड फटका बसला आहे. खरीप हंगाम जवळजवळ पूर्णपणे संपुष्टात आला आहे. मराठवाडा विभागात ४८ लाख हेक्टरवर वर खरीपाची पेरणी झालेली आहे. यातील जवळपास १०० टक्के पिकं अतिवृष्टी आणि पुराने बाधित झालेली आहेत. त्यामुळे एकट्या मराठवाड्यात एक लाख २० हजार एकर क्षेत्रावरील पिकं उद्ध्वस्त झाली आहेत. यावरून किती प्रचंड नुकसान झाले आहे याचा आपल्याला अंदाज येईल. सोयाबीन, तूर, उडीद, मूग, बाजरी, मका, कापूस, कांदा या पिकांसह फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मशागतीसाठी मजुरांवर केलेला खर्च वाया गेल्याने शेतकरी कर्जबाजारी होणार आहेत. अनेक भागात जमिनी खरवडून गेल्यामुळे रब्बी हंगामात पेरण्याही करता येणार नाहीत. खरीपासोबत रब्बी हंगामातून हाती काही लागणार नाही, सरकार मदत देण्याबाबात तोंडातून शब्द काढत नाही. निवडणुकीत दिलेला कर्जमाफीचा शब्द सरकारने पाळलेला नाही. त्यामुळे शेतकरी हताश आणि निराश आहेत.

### आभाळ फाटले

'ढगफुटी' हा शब्द राज्यातील जनतेने फक्त वृत्तवाहिन्यांच्या बातम्यात ऐकला होता किंवा वर्तमानपत्राच्या बातम्यांमध्ये वाचला होता. उत्तरेतल्या उत्तराखंड हिमाचल प्रदेश सारख्या राज्यांमधील लोकांनी अनुभवलेले हे महासंकट यंदा कायम दुष्काळग्रस्त मराठवाडा आणि विदर्भ अनुभवतो आहे. अवघ्या काही मिनिटांच्या पावसाने महापुराची स्थिती निर्माण होत आहे. नदी-नाल्यांना पूर येत आहे. शेतं, घरं पाण्याखाली जात आहेत. पिकांसोबत पोटच्या लेकराप्रमाणे सांभाळलेलं पशुधन वाहून जात आहे. उघड्या डोळ्यांनी हा विध्वंस पाहणे आणि आक्रोश करण्यापलीकडे शेतकरी काही करू शकत नाही. तळहातावरच्या फोडासारखे जपलेले पिकं अतिवृष्टी आणि पुरामुळे नष्ट झाल्याने त्या शेतात लोळून आक्रोश करणाऱ्या शेतकऱ्यांची दृश्ये आता रोजचीच झाली आहेत. त्यामुळे सरकारलाही आता ते पाहण्याची सवय झाला आहे. जनतेने दिलेल्या राक्षसी बहुमताच्या बळाने सत्ताधाऱ्यांची कातडी गेंड्याच्या कातडीपेक्षा जाड झाल्याने ते संवेदनाहीन झाले आहेत.

### असंवेदनशील सरकार

शेतकऱ्याचं आयुष्य आज उद्ध्वस्त झालं आहे, पण सरकारकडून ठोस मदत मिळणे दूरच सरकारने याची दखल तरी घेतली आहे का? असा प्रश्न पडावा इतकी बिकट स्थिती आहे. अद्याप नुकसानीचे पंचनामे झालेले नाहीत. पालकमंत्री फक्त ध्वजारोहणासाठीच जिल्ह्यात येतात. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यास त्यांना वेळ नाही, ती केली पाहिजे याची त्यांना अजिबात आवश्यकता वाटत नाही. तसे असते तर ते पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा देताना दिसले असते. पण दुर्दैवाने अद्याप तरी तसे दिसत नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीत अदानीला जमिनी देण्याचे निर्णय होतात. पण शेतकऱ्यांना नुकसनाभरपाई देण्याबाबत चर्चा होत नाही. मुख्यमंत्री शेतकऱ्यांना मदत करू या एका वाक्याच्या पुढे काहीच बोलत आणि करत नाहीत. राज्यातील जनतेने महायुतीला दिलल्या राक्षसी बहुमताची परतफेड सरकारकडून सुरू आहे, असेच म्हणण्यासारखी परिस्थिती आहे.

### शेती, शेतकरी सरकारच्या खिजगिणतीतही नाही

या गंभीर संकटाकडे दुर्लक्ष करून सरकार नेमके काय करत आहे? असा प्रश्न पडला असेल तर त्याचे उत्तर शोधण्यासाठी एकदा हैदराबाद गॅझेट जनतेने पहावे का? आरक्षणाच्या मुद्द्यावरून जनतेची दिशाभूल करून, संभ्रम निर्माण करून मराठा आणि ओबीसी संघर्ष पेटविण्याच्या कामात सरकार व्यस्त आहे. मनोज जरांगे-पाटील, छगन भुजबळ, लक्ष्मण हाके, मराठा अभ्यासक आणि ओबीसी कार्यकर्ते महाराष्ट्र एवढ्यापुरताच मर्यादित आहे. त्यात शेतकरी कष्टकरी यांचा समावेश नाही असे वाटावे इतक्या मोठ्या प्रमाणात माध्यमे त्यांच्यावर केंद्रित झालेली आहेत. सकाळ-दुपार- संध्याकाळ कोणत्याही वेळी कोणतीही वाहिनी लावा तुम्हाला हीच लोकं दिसतील आणि त्यांची वादग्रस्त वक्तव्ये आणि त्यावर सत्ताधाऱ्यांच्या प्रतिक्रिया दिसतील. एखाद्या दिवशी हे कमी पडले, तर गोपीचंद पडळकर, नितेश राणे यांची बेताल वक्तव्ये तयारच असतात. एकंदरीत जनतेच्या आयुष्याशी निगडित ज्वलंत प्रश्नांवर चर्चा होऊ द्यायचीच नाही हा सरकारी प्रयत्न यशस्वी झाला आहे. त्यामुळे अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेती आणि शेतकऱ्यांचा मुद्दा केंद्रस्थानी असणे तर दूरच साधा चर्चेतही नाही.

### सरकारपुरस्कृत संघर्ष

रोजच्या या सरकारी बीजपेरणीमुळे समाजही आता विभागला गेला आहे. नांदेड जिल्ह्यातल्या एका ओबीसी संस्थाचालकाच्या आश्रमशाळेतून मराठा पालकांनी आपल्या पाल्यांना काढून घेतले. मराठवाड्यात हा संघर्ष टोकाला गेला असून एकमेकांच्या दुकानातून खरेदीही केली जात नाही. एखाद्याने खरेदी केली तर त्यावर बहिष्कार घालण्याची भाषा काही विखारी लोक करत आहेत. मराठवाडा आणि लगतच्या अहिल्यानगर सोलापूर जिल्ह्यात मराठा विरुद्ध ओबीसी अशा दोन गटात समाज पूर्णपणे विभागला गेला आहे हे सत्य आहे. सरकार आपल्या राजकीय फायद्यासाठी जातीपाती पाहून काम करते. पण अतिवृष्टी आणि पुरासारखी संकटे जाती पाहून येत नाहीत. पुराचं पाणी मराठा शेतकऱ्याच्या शेतालाच वाहून नेतं आणि ओबीसी शेतकऱ्याच्या शेताला वाचवतं, असं होत नाही. नैसर्गिक संकट हे सर्वांना समानपणे भेडसावतं. तरीसुद्धा सरकारने या प्रश्नाला प्राधान्य न देता समाजाला जातीय संघर्षात अडकवणं हा बेजबाबदारपणा असून, सरकार तो अत्यंत जबाबदारीने पार पाडत आहे.

### महायुतीची बेईमानी

निवडणुकीत भाजप महायुतीने शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे, लाडकी बहीण योजनेचा निधी १५००वरून वाढवून २१०० रुपये करण्यासह, वीजबिलात ३० टक्के कपात करणार जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवणार, सोयाबीनला सहा हजार रुपये प्रतिक्विंटल दर देणार, किमान आधारभूत किमतीवर २० टक्के भावांतर योजना राबवणार, १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन देणार अशी अनेक आश्वासने भाजपने आपल्या जाहीरनाम्यात दिली होती. भाजप, शिवसेना (एकनाथ शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) या तिन्ही पक्षांनी दिलेल्या आश्वासनापैकी एकही आश्वासन सरकारने अद्याप पूर्ण केले नाही. पण यावरोधात जनतेमध्ये संताप निर्माण होणे दूरच याची साधी चचार्ही होऊ नये, याची पुरेपूर काळजी सरकार घेत आहे. त्यासाठीच आरक्षणावरून मराठा, ओबीसी वाद निर्माण करणे, हिंदू-मुस्लिम, गरब्यात आधार कार्ड पाहून सोडणे, वराह जयंती साजरी करणे असले उद्योग सुरू आहेत. जनतेला या जाळ्यात गुंतवून सरकार आपला कार्यभार साधून घेत आहे.

शेतकरी म्हणजे या भूमीचा कणा. पण आज तोच कणा मोडून पडला आहे. या संकटाच्या वेळी सरकारने तातडीने मदत जाहीर करायला हवी होती- नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे, भरपाई, मोफत बियाणे आणि खते, कर्जमाफीसारख्या तातडीच्या उपाययोजना करणे अपेक्षित होते. पण त्याऐवजी सरकार मराठा आणि ओबीसी हिंदू विरुद्ध मुस्लिम असे संघर्ष निर्माण करण्यास प्राधान्य देत आहे. राज्यात दररोज आठ शेतकरी आत्महत्या करतात. पण सरकारला शेतकऱ्याच्या आयुष्याची किंमत नाही. जातीय राजकारण करून सत्ता टिकवणे हेच त्यांचं प्रमुख उद्दिष्ट आहे. पण समाजानेही डोळसपणे विचार करायला हवा. जर शेतकरीच वाचला नाही, तर जातपात करून आपण काय उरणार आहोत? सरकारने जातीय भांडणं थांबवून तातडीने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी निर्णय घ्यावेत. कारण शेतकरी वाचला तरच महाराष्ट्र वाचेल.

# 'एआय'च्या डोईवर मंत्र्याची टोपी



तो सामना, त्यातील तो खेळाडू आता सर्वांच्या लक्षात राहिला असेल अशी शक्यता कमी आहे. परंतु 'हे नाव लक्षात ठेवा' (रिमेंबर द नेम), ही दूरचित्रवाणी समालोचक इयन बिशप यांची नाट्यमय गर्जना आपल्यापैकी अनेकांच्या आठवणी अजूनही ताज्या करेल. कार्लस ब्रॅथवेट या वेस्ट इंडीजच्या एका क्रिकेटपटूने २०१६च्या विश्वकरंडक क्रिकेट सामन्यात गाजवलेल्या भीमपराक्रमानंतर बिशप यांनी कौतुकाने हे शब्द उच्चारले होते. २००५मध्ये प्रदर्शित झालेल्या एका पाश्चात्य गीताच्या या ओळी होत्या. या सर्वांची आठवण होण्याचे कारण म्हणजे पुन्हा एक नाव आपल्या स्मृतिपटलांवर कोरले जाईल, असे नाट्यमय निमित्त समोर आले आहे. यावेळी ते जगाच्या भूराजकीय पटलावर उलगडत आहे. ते नाव आहे डाएला. ही डाएला आग्नेय युरोपातील अल्बेनियाची आहे. दोघांमध्ये महत्त्वाचा फरक आहे, तो म्हणजे ती क्रिकेटच्या मैदानावर नव्हे, तर आपल्या देशाचे भवितव्य घडवण्यासाठीच्या पटलावर ही कामगिरी बजावण्याची अपेक्षा आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे डाएला हे नाव स्त्रीचे असले तरी ती कोणी स्त्री-पुरुष नव्हे, तर कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स - एआय) असणारी ती आभासी प्रतिमा आहे! अल्बेनियाचे पंतप्रधान इडी रामा यांनी आपल्या मंत्रिमंडळात या डाएलाचा समावेश करण्याची घोषणा नुकतीच केली. सार्वजनिक खरेदी खात्याचे मंत्रिपद तिच्यावर सोपवण्यात आले. जगाच्या इतिहासात प्रथमच कोणी मनुष्येतर अशा प्रकारची भूमिका यानिमित्ताने बजावणार आहे. अर्थात, पूवार्नुभव गाठीशी घेऊन ती ही जबाबदारी पार पाडणार आहे. आतापर्यंत ई-प्रशासनाच्या कामकाजात तिचा सहायक म्हणून सहभाग राहिला असून, दहा लाखांहून अधिक अर्जदारांना त्याद्वारे तिने मदत-मार्गदर्शन केले आहे. अल्बेनियाची पार्श्वभूमी - अल्बेनिया हा युरोपातील ग्रीसशी सीमा संलग्न असणारा देश. पाचशे वर्षांहून अधिक काळ हा देश ओटोमान राजवटीचा भाग होता. त्यानंतर विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या देशात कम्युनिस्ट सत्ता आली. परंतु सातत्याने खालावत चाललेली आर्थिक स्थिती आणि सामाजिक अस्वस्थता यांमुळे त्याच शतकाच्या अखेरच्या दशकात तीदेखील उलथवून टाकली गेली. निवडणुकांद्वारे लोकनियुक्त सरकार स्थापनेचा मार्ग खुला झाला. या तीन दशकांच्या वाटचालीतही जो डाग हा देश धुवून काढू शकलेला नाही, तो आहे भ्रष्टाचाराचा. भ्रष्ट देशांच्या निदेर्शांकात २०२४मध्ये हा देश १८० देशांच्या यादीत ८०व्या स्थानी होता. रशिया, बेलारूस, अझरबैजान यांसारखे पूर्व युरोपातील कम्युनिस्ट देश असोत की सर्बिया, तुर्की यांसारखे आसपासचे देश असोत, त्यांच्या तुलनेत अल्बेनिया या यादीत पिछाडीवर आहे आणि भ्रष्टाचाराविषयीच्या जनमानसातील प्रतिमेच्या दृष्टीनेही. या पार्श्वभूमीवर, सध्याचे पंतप्रधान इडी रामा यांच्या निर्णयाकडे पाहायला हवे. ते आणि त्यांचा सोशालिस्ट पक्ष या देशात दीर्घकाळ सत्तेवर आहे. एक कलाकार-लेखक म्हणून पार्श्वभूमी असणारे रामा हे २०१३पासून देशाचे पंतप्रधान आहेत. सलग चार निवडणुकांमध्ये ते सत्तेवर राहण्यात यशस्वी झाले आहेत. अलीकडेच झालेल्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाने भ्रष्टाचारमुक्त शासन हा प्रचाराचा मुख्य मुद्दा केला होता. देशातील भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे ही सार्वजनिक सेवा-सोयी उभारण्यातील खरेदीशी जोडलेली असल्यामुळे, आता याच खात्यासाठी एआयचा आधार घेण्याचे पाऊल रामा यांनी उचलले आहे. तंत्रज्ञानाचा सुशासनासाठी आधार - एआय बॉटला मंत्रिपद देणारा अल्बेनिया हा जगातील पहिलाच देश असला तरी अशा डिजिटल तंत्रज्ञानांचा कार्यक्षमता, पारदर्शकता किंवा उत्तरदायित्व प्रस्थापित करण्यासाठी आधार घेतला जाण्याचे हे जगातील पहिलेच उदाहरण नाही. संयुक्त अरब अमिरात या आखाती देशाच्या ह्यकृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०३१'नुसार, सर्व स्तरांवरील शासकीय कामकाजात एआयचा समावेश केला जात आहे. सिंगापूरनेही याच धर्तीवर ह्यस्मार्ट नेशन २.०' अंगीकारले आहे. ईशान्य युरोपातील इस्टोनियाने तर आणखी क्रांतिकारी पावले उचलून आपल्या सर्व सार्वजनिक सेवा डिजिटल केल्या आहेत. अमेरिकेमध्येही आता एआय वापरून शासकीय कामकाजात कार्यक्षमता आणि मूल्यप्रस्थापना कशी वाढवता येईल, याची चाचपणी केली जात आहे. माहिती तंत्रज्ञानाशी जोडलेल्या सेवा आणि खरेदी प्रक्रिया यांत एआय आणि रोबोटिक्स यांचा वापर वाढवण्यासाठी तेथील सामान्य प्रशासन विभाग प्रयत्नशील आहे. डाएलाची नियुक्ती ही या पार्श्वभूमीवर देखील जगातील पहिलीच म्हणायला हवी. कारण एका मंत्रिपदाची जबाबदारी यानिमित्ताने एआयवर सोपवण्यात आली आहे. तंत्रज्ञानाचा आधार घेण्याऐवजी तंत्रज्ञानावरच निर्णय सोपवणे हा यांमधील मूलभूत फरक आहे. तरीही, खुद्द अल्बेनियाची जनता या निर्णयाकडे सावधपणेच पाहात आहे. तेथील समाजमाध्यमांमध्ये याचे प्रतिबिंब उमटत आहे. डाएलालाही येथील राजकारणी भ्रष्टाचार शिकवतील, एवढ्या टोकाला जाऊन या प्रतिक्रिया उमटत आहेत. कोणतीही व्यवस्था असो आणि ती कितीही प्रगत असो, तिला गुंडाळून ठेवून स्वार्थ कसा साधायचा, हे राजकारण्यांना ठाऊक असते... आणि अशी भ्रष्ट मानसिकतेची माणसेच जोवर खरी सूत्रे हाताळत राहतील तोवर हा प्रश्न सुटू शकणार नाही, अशी हताश भावनाही तेथील जनता व्यक्त करत आहे.


एआय मंत्रिपदाचे अधिक-उणे तांत्रिक आदर्शवाद आणि राजकीय वास्तव यांमधील पोकळीतून ही निराशा व्यक्त होणे स्वाभाविक आहे. आता प्रश्न ही पोकळी कोण आणि कशी भरून काढेल, हा आहे. या एआय मंत्र्याकडील जबाबदारीचे स्वरूप पाहिले, तर मानवी इरादे कितीही स्वच्छ ठेवले तरी शक्य होणार नाही एवढी कार्यक्षमता आणि निरपेक्ष कार्यपद्धत या तंत्रज्ञानातून राबवली जाऊ शकते. डाएलापुढे सार्वजनिक खरेदीतील निविदा, कंत्राटदार यांची माहिती, पार्श्वभूमी यांची इत्थंभूत आकडेवारी व संदर्भ निर्णय घेण्यासाठी हजर राहणार आहेत. कोणताही गैरप्रकार निदर्शनाला आल्यास किंवा तसा पूर्वेतिहास ज्ञात झाल्यास अपात्रतेचा निकष लागू करण्याचा अधिकार हा एआय बॉट अमलात आणेल, हे स्वाभाविक आहे. कारण पूर्णपणे स्वतंत्र अधिकार म्हणून काम करताना तंत्रज्ञान कोणतेही मानवी प्रभाव किंवा हस्तक्षेप स्वीकारण्याची शक्यता नाही. शिवाय, अशा निर्णयप्रक्रियेचा वेग आणि व्याप्ती या बाबतींतही तंत्रज्ञानाचा हात कोणी धरू शकणार नाही. त्यामुळे ना कोणते हितसंबंध या निर्णयप्रक्रियेत अडसर ठरू शकतील ना कोणती चालढकल निर्णयांची कार्यवाही रोखू शकेल. मग त्रुटी कोठे राहू शकतात? येथे पेराल ते उगवेल किंवा खरे तर ह्यपुरवाल त्याचाच पुरवठा होईल, हा मुद्दा अडचणीचा होऊ शकतो. कोणतीही एआय-आधारित व्यवस्था ही तिला पुरवलेल्या माहितीच्या खाद्यावरच कार्यरत राहते. अल्बेनियाचेच उदाहरण घ्यायचे, तर त्या देशातील आजवरच्या सार्वजनिक खरेदीचा इतिहास हा भ्रष्ट मार्गांनाच राजमान्यता देणारा असेल तर त्यांवर आधारित माहितीसाठा हाच डाएलाच्या निर्णयांचा आधार ठरू शकतो. कदाचित, मानवी चतुराईला न दिसलेल्या चोरवाटा डाएलाला मात्र सहज दिसूही शकतात. या एआयचे अल्गोरिदम कसे ठरवले जातात, हादेखील कळीचा मुद्दा होऊ शकतो, कारण ती बाब मानवी हस्तक्षेप निर्माण करणारी आहे. विशिष्ट उद्देश वा परिणाम डोळ्यांपुढे ठेवून ते अल्गोरिदम तयार केले गेले तर भ्रष्टाचाराला मागील दार उघडे राहू शकते. अशा स्थितीत होणारी चूक ही एआयची म्हणायची की तिचे संचलन करणाऱ्या मानवी व्यवस्थेची? त्याला उत्तरदायी डाएला असेल की तिची आणि तिच्यासाठीच्या परिसंस्थेची नेमणूक करणारे त्या देशाचे पंतप्रधान? त्या भ्रष्टाचाराची लाभार्थी डाएला असेल की त्या निर्णयाची प्रत्यक्ष कार्यवाही करणारे सरकारी अधिकारी किंवा राजकारणी? भ्रष्टाचार हा सामाजिक-राजकीय संदर्भांमध्ये गुंतलेला विषय आहे. तो सोडवण्यासाठी संस्थात्मक सुधारणा, सामाजिक-सांस्कृतिक सजगता आणि न्यायालयीन स्वायत्तता या आघाड्यांवरील प्रयत्न अधिक परिणामकारक व दीर्घकालीन ठरू शकतात. एखादा एआय मंत्री हा त्यातील तांत्रिक दोष दूर करू शकतो, परंतु मुळापासून व्यवस्थेमध्ये बदल करू शकत नाही. उलट, भ्रष्टाचारावर इलाज केल्याची जनतेची दिशाभूल करणारे हत्यार म्हणून त्याचा वापर होण्याचाही धोका संभवतो. भारतासारख्या देशात यापूर्वी भ्रष्टाचाराला पायबंद घालण्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा करण्यापासून लोकपालसारख्या नियुक्त्या करण्यापर्यंत आणि माहितीच्या कायद्यापासून थेट लाभार्थी हस्तांतर योजनांपर्यंत अनेक उपाय झाले आहेत. परंतु त्यातून भ्रष्टाचाराचे दुखणे काही दूर होऊ शकलेले नाही. ह्यआधारह्णसारखी नागरिकांची डिजिटल ओळख निर्माण करण्यातील यश, यूपीआयसारखी डिजिटल व्यवहारांची व्यवस्था, ई-प्रशासनासाठीच्या उपायांचा प्रसार अशा अनेक डिजिटल सुधारणा आपल्या देशात झाल्या आहेत. परंतु भ्रष्टाचार निर्मूलनाचे इंगित या व्यवस्थांमध्ये नव्हे तर त्या राबवणाऱ्या माणसांच्या हातांत आणि त्यांच्या वृत्तीमध्ये आहे. एकूणच, अल्बेनियासारखा छोटा युरोपीय देश असो की भारतासारखा महाकाय देश, एआय हे तेथील समस्यानिवारणाचे साधन होऊ शकते, निवारणकर्ता किंवा कर्ता नव्हे. भ्रष्टाचाराचा मुकाबला हा मानवी प्रयत्नांमधूनच अंतिमतः होऊ शकणार आहे. त्यात एआयची साथ ही अत्यंत परिणामकारक व व्यापक ठरू शकते.

# 'ब्रह्मचारिणी' दुर्गेचे दुसरे रूप

नवशक्तीपैकी 'ब्रम्हचारिणी' हे दुर्गेच्या दुसरे रूप आहे. येथे 'ब्रह्म' या शब्दाचा अर्थ तपस्या आहे. ब्रम्हाचारिणी म्हणजे तपाचे आचरण करणारी. नवरात्राच्या दुसऱ्या दिवशी या मातेची पूजा केली जाते. या दिवशी साधकाचे मन 'स्वाधिष्ठान' चक्रात स्थिर होते. या चक्रात मन स्थिर करर्णायाला तिची कृपा आणि भक्ती प्राप्त होते. या देवीचे रूप अतिशय देखणे आणि भव्य आहे.

तिच्या उजव्या हातात जपमाळा आणि डाव्या हातात कमंडलू असतो. तिने पूर्वजन्मात हिमालयाची कन्या म्हणून जन्म घेतला त्यावेळी नारदमुनींने तिला भगवान शंकर पती म्हणून मिळावा यासाठी कठोर तपस्या करायला सांगितली होती. या तपयेमुळे या देवीला तपर्श्चाणी किंवा ब्रह्मचारिणी असे म्हणतात.

एक हजार वर्षापर्यंत तिने फळे खाऊन तपश्चर्या केली. उपवास काळात तिला ऊन आणि पावसाचा भयानक त्रास सहन करावा लागला होता. या तपश्चर्येनंतर तीन हजार वर्षांपर्यंत केवळ जमिनीवर पडलेली बेलपत्रे खाऊन दिवस काढले. यानंतर सुकलेले बेलपत्र खायचे सोडून दिल्यामुळे तिला 'अपर्णा' हे एक नाव पडले.



अनेक वर्षे कठोर तपश्चया केल्यामुळे तिचे शरीर क्षीण झाले होते. तिची ही अवस्था पाहून तिची आई मेना खूप दु:खी झाली होती. तिने तिला या कठीण तपस्येपासून मुक्त करण्यासाठी 'उमा' अगं! नको ग नको! अशी हाक दिली. तेव्हापासून देवी ब्रह्मचारिणीच्या पूर्वजन्माचे 'उमा' हे एक नाव पडले. तिची ही तपस्या पाहून त्रिलोकात हाहाकार उडाला. सर्व देवदेवता तिच्या तपस्येची प्रशंसा करूलागले. शेवटी ब्रम्ह देवाने तिला आकाशवाणीद्वारे संबोधित करून सांगितले, की 'हे देवी! आजपर्यंत इतकी कठोर तपश्चर्या कुणीही केली नाही. तुझ्या तपस्येची सगळीकडे प्रशंसा होत आहे. तुझी मनोकामना लवकरच पूर्ण होईल. भगवान शंकर तुला पती रूपात प्राप्त होतील. आता तू तपस्या सोडून लवकर घरी जा. लवकरच तुझे पती तुला घ्यायला येतील.' असा वर त्यांनी दिला.

ब्रह्मचारिणी भक्तांना अनंत फळे देणारी आहे. तिची उपासना केल्याने मनुष्याच्या तप, त्याग, वैराग्य आणि संयमात वाढ होते. देवीच्या कृपेने मानवाला सर्वत्र विजय आणि सिद्धी प्राप्त होते. अशा प्रकारे हे दुर्गेचे दुसरे रूप आहे.

# नवरात्रीतील पहिली माळ, जाणून घ्या कोण होती देवी शैलपूत्री?


नवरात्रीच्या पहिल्या दिवशी देवीच्या शैलपुत्री रूपाची पूजा केली जाते. देवीचे हे रूप अतिशय शांत असून देवी शैलपुत्रीच्या उजव्या हातात त्रिशूळ आणि डाव्या हातात कमळ आहे. तिच्या कपाळावर चंद्र असून हिमालयावर विराजमान असलेली देवी नंदी बैलावर स्वार आहे. शैलपुत्रीचे हे रूप ममतेचे आणि आपुलकीचे प्रतीक आहे. शैलपुत्री मातेला 'वृषोरुधा' आणि 'उमा' असेही म्हणतात. असे सांगितले जाते की, शैलपुत्रीचा जन्म हिमालय पर्वतराजाच्या घरी झाला. त्यामुळे तिचे नाव शैलपुत्री असे पडले. कठोर तपश्चर्या करणारी देवी शैलपुत्री ही सर्व प्राणिमात्रांची रक्षक मानली जाते. जाणून घेऊयात या देवीची कथा आणि पूजा कशी करावी,

अशी करा पूजा -

आज अर्थात पहिल्या दिवशी घटस्थापना झाल्यानंतर देवीला हलके वस्त्र परिधान करुन शैलपुत्रीची आराधना करावी. मनोमनी देवीचे स्मरण करावे. त्यानंतर देवीच्या **''ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डाय विच्चे ॐ शैलपुत्री देव्यै नमः।''** या मंत्राचा 108 वेळा जप करावा. जप झाल्यानंतर देवीला पांढऱ्या रंगाची मिठाई अर्पण करावी.

देवी शैलपुत्रीची कथा -

पौराणिक कथेनुसार, राजा दक्षने आपल्या निवासस्थानी यज्ञ आयोजित केला आणि सर्व देवी-देवतांना आमंत्रित केले. पण, आपल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी त्याने महादेवांना बोलावले नाही. त्यावेळी दक्षकन्या आणि महादेव पत्नी सतीने आपल्या वडिलांच्या घरी यज्ञात सहभागी होण्याची इच्छा महादेवांकडे व्यक्त केली. सतीच्या विनंतीवरून महादेवांनी देखील तिला जाण्याची परवानगी दिली, तिथे पोहोचल्यावर दक्षाने महादेवांचा अपमान केला. त्यावेळी पती महादेवांचा झालेला अपमान पाहून देवी सतीने रागात सुरु असेल्या यज्ञ कुंडात उडी मारली. त्यावेळी सतीचा मृत्यू झाला. त्यानंतर पुढच्या जन्मी शैलराज हिमालयाच्या घरी सतीचा पार्वती रुपात जन्म झाला. जिथे तिला 'शैलपुत्री' देखील म्हटले जाऊ लागले.



# नवरात्र माहिती, नवरात्र काय आहे ? जाणून घ्या

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अनेक सण उत्सव मोठ्या उत्साहात आनंदात साजरे केले जातात. त्यापैकीच नवरात्र हा देवीचा उत्सव भारतात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होतो. आपल्या लाडक्या गणपती बाप्पाचं विसर्जन केल्यावर पितृ पंधरवड्यानंतर आतुरतेने नवरात्रीच्या उत्सवाची वाट बघतो. अश्विन महिन्याच्या पहिल्या दिवशी नवरात्रोत्सवाला सुरुवात होते.या नवरात्राला शारदीय नवरात्र असे ही म्हणतात. नवरात्राच्या पहिल्या दिवशी घटस्थापना केली जाते. सार्वजनिक मंडळ देवीच्या मूतीची स्थापना करतात. या नऊ दिवसात एक आगळा वेगळा उत्साह असतो. अखंड नऊ दिवस देवीआईची मनोभावे सेवा पूजा,आरती केली जाते. घटस्थापना करताना देवीसमोर घट स्थापना केला जातो.एका परडीमध्ये काळी माती ठेऊन या मातीमध्ये नऊ धान्य पेरतात.त्यावर पाण्याने भरलेला एक घट ठेवतात. या घटात आंब्याची किंवा नागलीची (विड्याची)पाने ठेवतात.त्यावर नारळ ठेवला जातो. देवीचे टाक ठेवतात.त्याच्यापुढे ५ फळे ठेवतात. या घाटाला झेंडूच्या फुलांची माळ घालतात.



देवीपुढे अखंड दिवा तेवत ठेवला जातो.मनोभावाने देवीआईची उपासना आरती केली जाते. काही लोक नऊ दिवस अनवाणी राहतात.काही निराहार उपास करतात. दसऱ्याच्या आदल्या दिवशी म्हणजे नवमीला देवीपुढे होम हवन केले जाते. काही काही घरात पंचमी काही घरात षष्ठीचा फुलोरा करतात.या मध्ये देवीच्या वर कडकण्या बांधतात.


नवरात्रीच्या नऊ दिवशी देवी आईला वेगवेगळ्या रंगाच्या साड्या नेसवतात.हे नाय रंग धर्मशास्त्रज्ञांनी ठरविले असतात.देवीआईला महिषासुर मर्दिनी देखील म्हणतात.त्या मागील कारण असे की देवी आईने नऊ दिवस दैत्यांशी युद्ध करून महिषासुराचे वध केले होते.

नवरात्राच्या निमित्ताने सार्वजनिक मंडळात गरब्याचे आयोजन केले जाते. सोसायटींमध्ये बायका भोंडल्याचे आयोजन करतात. या मध्ये एका पाटावर हत्ती काढून त्याच्या अवती भवती फेर धरला जातो.आणि भोंडल्याची गाणी म्हणतात. बायका आपापल्या घरून खाण्याच्या वस्तू आणतात आणि त्या ओळखायच्या असतात.त्याला खिरापत असे म्हणतात.

नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीआईच्या मंदिरात भाविकांची गर्दी ओसंडून वाहते.बायका देवीआईची खणा नारळाने ओटी भरतात. काही देवीआईचे भक्त घरोघरी जाऊन जोगवा मागतात. अश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी असे म्हणतात.यालाच दसरा असे ही म्हणतात. दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक आहे. दसरा हा सण विजयाचे प्रतीक आहे.असत्यावर सत्याच्या विजयचा प्रतीक आहे दसरा. या दिवशी रामाने रावणाचे वध केले होते. या दिवशी रावण, मेघनाथ, कुंभकर्णाच्या पुतळ्यांचे दहन करतात. आपट्याची पाने आणतात आणि घरात तांदुळाचा बळी बनवून बळीचा वध करतात. या दिवशी शुभमुहूर्तावर नवीन कामे हाती घेतली जातात. यादिवशी पाटीवर सरस्वती काढून तिची पूजा केली जाते. सरस्वतीला गूळ खोबऱ्याचा नैवेद्य दाखविला जातो. आपट्याची पाने मित्र मंडळींना, गुरूंना, मोठ्या माणसांना देऊन त्यांचा आशीर्वाद घेतात. तसेच यादिवशी व्यापारी, कामगार आपल्या शस्त्रात्रांची पूजा करतात. अशाप्रकारे हा नवरात्रीचा सण भारतात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

# देशातील या मंदिरात असतो नवरात्रीचा अनोखा उत्सव

शारदीय नवरात्रीची स्थापना अश्विन महिन्याच्या शुल्क पक्षाच्या प्रतिपदेला केली जाते. नऊ दिवस देवीच्या विविध नऊ रुपांची पूजा केली जाते. भाविक मनोभावे देवीची पूजा करत उपवास करतात. दुगार्देवी ही सुख, शांती आणि धनाची देवी असल्याचे मानले जाते. त्यामुळे भाविक मोठ्या भक्तीने या दिवसात देवीचे दर्शन घेण्यासाठी देशभरातील प्रसिद्ध मंदिरात जातात. आज आपण जाणून घेऊयात अशी मंदिरे जिथे नवरात्रीचा उत्सव मोठ्या आनंदात साजरा केला जातो.



कामाख्या मंदिर - 51 शक्तीपीठांपैकी एक प्रमुख शक्तीपीठ कामाख्या मातेचे मंदिर आहे. येथे सती देवीच्या योनी भागाची पूजा केली जाते. अनेक देशांतून भक्तगण देवीच्या दर्शनाला येथे येतात.

मनसा देवी मंदिर - हरिद्वारमध्ये मनसा देवीचे मंदिर आहे. हे मंदिर 1811 ते 1815 दरम्यान राजा गोला सिंग यांनी बांधले होते. मनसा म्हणजे इच्छा पूर्ण करणारी, त्यामुळे मनोवाच्छित इच्छा पूर्ण करण्यासाठी भक्तगण येथे जातात.

ज्वाला देवी मंदिर - हिमाचल प्रदेशातील कालीधर टेकडीजवळ ज्वाला देवी मंदिर आहे. देवीच्या सर्वात प्राचीन मंदिरामध्ये या मंदिराची स्थापना होते.

दक्षिणेश्वर काली मंदिर - दक्षिणेश्वर मंदिर कोलकत्तामध्ये आहे. दरवर्षी येथे मोठ्या उत्साहात नवरात्री साजरी केली जाते.

नैना मंदिर - उत्तराखंडमधील नैनीतालच्या नैना तलावाजवळ हे नैना मंदिर स्थित आहे. या मंदिरात सती देवीच्या रुपाची पूजा केली जाते.

विध्याचल मंदिर - उत्तर प्रदेशातील मिझार्पूर जिल्ह्यात विंध्यवासिनी देवीचे मंदिर आहे. येथे नवरात्रीचा उत्सव मोठ्या दिमाखात पार पडतो.

वैष्णोदेवी मंदिर - पवित्र स्थळांपैकी एक असणारे वैष्णोदेवी मंदिर त्रिकुट पर्वतांमध्ये स्थित आहे. येथे तुम्हाला केवळ मातेचा जयघोष ऐकू येतो. भाविक गुहेच्या मंदिरापर्यंत उंच डोंगरावर चढतात किंवा घोड्यावर स्वार होतात.

ज्वाला देवी मंदिर - कांगडा खोऱ्यातील ज्वाला देवी मंदिरात मूर्ती नाही, त्याऐवजी देवीला शतकानुशतके जळत्या ज्वालांच्या रुपात पूजले जाते. त्यामुळे हे मंदिर रहस्यमय मानले जाते.

महालक्ष्मी मंदिर - कोल्हापुरात असलेले महालक्ष्मी मंदिर हे 51 शक्तीपीठांपैकी एक आहे आणि त्याला 'अंबाबाई मंदिर' असेही म्हणतात. हे मंदिर त्याच्या कोरीवकाम आणि इतिहासामुळे अध्यात्माचे केंद्रबिंदू मानले जाते.

चामुंडेश्वरी मंदिर - म्हैसूरमधील चामुंडी टेकड्यांवर वसलेले, हे मंदिर 1000 वर्षांपूवीर्चे आहे, जे वास्तुकला आणि उपासनेचे स्मारक आहे. यात्रेकरूंना येथे 1000 पायऱ्या चढल्यानंतर देवीचे दर्शन घडते.

# यंदाचा नवरात्र उत्सव 10 दिवसांचा, या तिथीची वाढ झाल्याने आनंदात वाढ



तिथीप्रमाणे दरवर्षी आश्विन शु. 1 या दिवशी घटस्थापना होते आणि शारदीय नवरात्र उत्सवाला सुरुवात होते. पुढे 9 दिवस पूजा केल्यानंतर दहाव्या दिवशी दसरा असतो. मात्र, यंदा नवरात्र उत्सव 9 नव्हे तर 10 दिवसांचा असणार आहे. याचे मुख्य कारण म्हणजे तृतीया तिथीची वृद्धी झाली आहे. यंदा आश्विन शुक्ल तृतीयाचा एक दिवस वाढला आहे. म्हणजेच ही तिथी 24 आणि 25 सप्टेंबर असे दोन दिवस आहे. दोन दिवस सूर्योदयाला एक तिथी असली की त्याला वृद्धी म्हणतात. त्यामुळे नवरात्र उत्सव 10 दिवसांचा झाला आहे, अशी माहिती खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण यांनी दिली. अश्विन महिन्यात शरद ऋतूत धान्य घरात येते. शरद ऋतू हा संपन्नतेचा ऋतू आहे.

पृथ्वीवर धान्याची निर्मिती केली जाते. म्हणून निर्मिती शक्ती म्हणजेच आदिशक्तीचे पूजन केले जाते. 13.7 अब्ज वर्षांपूर्वी विश्वाची निर्मिती झाली, असे खगोलशास्त्र सांगते. तेव्हापासून निर्मिती सुरू झाली आहे. धान्य पेरल्यावर ९ दिवसांनी अंकुरते, गर्भधारणेनंतर 9 महिने 9 दिवसांनी मूल जन्मते. म्हणून आदिशक्तीचे पूजन 9 अंकाने म्हणजे ९ दिवस करण्याची प्रथा आहे. 9 अंक खूप महत्त्वाचा आणि सर्वांत मोठा अंक आहे. याला ब्रह्मसंख्या म्हटली जाते.

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांचे महत्त्व

देशात देवीची 51 शक्तीपीठे आहेत. त्यातील साडेतीन शक्तीपीठे महाराष्ट्रात आहेत. यात कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची भवानी, माहूरची रेणुका माता आणि वणीची सप्तशृंगी माता (अर्धे शक्तीपीठ) यांचा समावेश आहे. या सर्व शक्तीपीठांमध्ये आजपासून भव्य स्वरुपात नवरात्र उत्सव साजरा होत आहे. 10 दिवस विशेष पूजाअर्चा, भजन-किर्तन केले जाणार आहे. मंदिर परिसर भक्तिभावाने आणि उत्साहाने उजळून निघण्यास सुरवातदेखील झाली आहे.

त्वरीता, तुरजा ते तुळजा

मंदाकिनी नदीकाठी तप करताना 'अनुभूती'वर कुक्कर राक्षसाने हल्ला केला तेव्हा तिने जगदंबेचा धावा केला. देवी त्वरीत मदतीला धावली आणि राक्षसाला ठार मारले. देवी त्वरीत आली म्हणून तिला 'त्वरीता' नाव मिळाले. पुढे त्याचा अपभ्रंश होऊन तुरजा, तुळजा झाले. हीच तुळजापूरची कुलस्वामिनी तुळजाभवानी होय. नवरात्र उत्सवात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी आणि उत्साह पाहायला मिळतो. या निमित्ताने 10 दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

देवीच्या नावात राक्षसांचे नाव

ब्रह्मदेवाचा मानसपुत्र कोल्हासूर आणि त्याचा मुलगा करवीर हे लोकांना फार छळत होते. अखेर सर्वांच्या इच्छेनुसार शंकराने करवीराचा वध केला तेव्हा संतप्त झालेल्या कोल्हासुराने सर्वांना त्रास देण्यास सुरुवात केली. लोकांनी जगदंबेचा धावा केला. देवीने प्रकट होत कोल्हासुराचा वध केला. मात्र, मृत्यूपूर्वी त्याने देवीकडे तिच्या नावात स्वतःचे आणि मुलाचे नाव यावे, असे वरदान मागितले. त्यानंतर देवी 'करवीर निवासिनी कोल्हापूरची महालक्ष्मी' या नावाने देवी प्रसिद्ध झाली.

पुत्राच्या भेटीसाठी आई व्याकुळ

परशुराम हे जमदग्नी आणि रेणुका यांचे पुत्र. जमदग्नी यांच्या मृत्यूनंतर एका पारड्यात त्यांचा मृतदेह आणि दुसऱ्या पारड्यात आई रेणुका यांना घेऊन भगवान माहूरगडावर आले होते. तेव्हा हे परशुरामा तू येथेच थांब, अशी आकाशवाणी झाली. परशुरामाने वडिलांच्या चितेला अग्नी दिला. त्या चित्तेत माता रेणुकानेही उडी मारली. पुन्हा आकाशवाणी झाली आणि परशुरामांना एक महिन्याने परत येण्यास सांगितले. मात्र, परशुरामाला आईची खूप आठवण येताच माता रेणुका कमरेपर्यंत बाहेर आल्या. हीच माहूरगडची रेणूकादेवी. येथे प्रभू भगवान दत्तात्रयांचे निद्रास्थान देखील आहे.

सप्तश्रृंगी वणी

हनुमान द्रोणागिरी पर्वत घेऊन जात असताना त्याचे 7 तुकडे येथे पडले. या पर्वतावर देवीने महिषासुराचा वध केला आणि तेथेच वास्तव्य केले. हा वणीचा डोंगर प्रसिद्ध आहे. ही देवी 18 हातांची आणि 8 फूट उंच आहे. येथे नवरात्रीत पालखी पूजन, नगर प्रदक्षिणा, शतचंडी याग, होमहवन, पूजा, कीर्ती ध्वजाची मिरवणूक, ध्वजारोहण, महापूजा आदी आजपासून होणार आहेत. उत्सवासाठी 20 लाख भाविक येण्याचा अंदाज आहे.

# नवरात्रीतील देवीचे आवडते नऊ पदार्थ



शास्त्रानुसार, दररोज देवीला वेगवेगळे नैवेद्य अर्पण केले जातात. असे केल्याने देवी प्रसन्न होते असे म्हटले जाते. चला तर मग जाणून घेऊया नवरात्रीत नऊ दिवस कोणत्या देवीला कोणता नैवेद्य दाखवावा?

नवरात्रीचा पहिला दिवस हा शैलपुत्री देवीला समर्पित असतो. या उत्सवाची सुरूवात शैलपुत्री देवीच्या पूजेपासून केली जाते. या दिवशी देवीला तूप अर्पण केल्याने भक्तांना आनंद, सौभाग्य आणि आरोग्य लाभते. या दिवशी नैवेद्यासाठी गायीच्या देशी तूपासोबत हलवा, रबडी आणि माव्याचे लाडू बनवू शकता. तुप हे आपल्या शरीरासाठी खुप फायदेशीर असते. तुप खाल्याने हाडे मजबूत होतात तसेच शरीरातील रोगप्रतीकार शक्ती वाढते.

नवरात्रीच्या दुसरा दिवशी ब्रम्हचारिणी देवीची पूजा करतात. या दिवशी देवीला साखर किंवा पंचामृत अर्पण करणे शुभ मानले जाते. तसेच ९ दिवसांचा उपवास असताना प्रसाद म्हणून साखर आणि पंचामृत खाता येते.

नवरात्रीच्या तिसऱ्या दिवशी देवी चंद्रघंटाची पूजा करतात. चंद्रघंटाला देखील दुधापासून बनवलेला पदार्थ नैवेद्य म्हणून दाखवला जातो. दूध हे देखील आपल्या शरीरासाठी चांगले असते. त्यामुळे मन शांत होते.

नवरात्रीचा चौथा दिवस हा देवी कुष्मांडाला समर्पित असतो. या दिवशी तिला मालपुआ अर्पण करणे शुभ मानले जाते. हा उत्तर भारतातील पारंपरिक पदार्थ आहे जो गहू, गुळ, साखर, इलायची आणि मीठ तसेच दूध, नारळ, दही यांच्यापासून बनवला जातो.

नवरात्रीच्या पाचव्या दिवशी स्कंदमातेची पूजा केली जाते. या दिवशी देवीला केळी अर्पण करावे. केळी ही आरोग्यासाठी चांगली असतात.

नवरात्रीच्या सहाव्या दिवशी कात्यायनी देवीची पूजा करतात. कात्यायनीला मधाचा नैवेद्य दाखवला जातो. या दिवशी देवीला मध अर्पण केल्याने समृद्धी येते असे म्हणतात.

नवरात्रीच्या सातव्या दिवशी देवी कालरात्रीची पूजा केली जाते. कालरात्रीला गुळाचा नैवेद्य दाखवला जातो. या दिवशी देवीला गुळापासून बनवलेले पदार्थ अर्पण करावे. गुळामुळे रोगप्रतिकारकशक्ती वाढते तसेच हाडे मजबूत होतात.

नवरात्रीचा आठवा दिवस महागौरीला समर्पित असतो. या दिवशी दुर्गा मातेच्या या रूपाची पूजा केली जाते. नवरात्रीच्या आठव्या दिवशी नारळाचा प्रसाद अर्पण करणे योग्य मानले जाते. या दिवशी नारळापासून बनलेली बर्फी, नारळाचे लाडू नैवेद्याला बनवावे.

नवरात्रीच्या शेवटच्या दिवशी देवी सिद्धीदात्रीची पूजा केली जाते. या दिवशी नवरात्रोत्सवाची सांगता होते. या दिवशी देवीला हलवा, पुरी आणि चणे अर्पण करावे.

# दर महिन्याला सात हजार रुपये दे...घरी बसून नोकरी कर! मुंबई महापालिकेच्या घनकचरा विभागातील कर्मचाऱ्याची लाचखोरी उघड

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील एका कनिष्ठ पर्यवेक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ८ हजार रुपयांची लाच घेताना पकडले. आजारी असलेल्या एका सफाई कामगाराकडून लाच स्वीकारताना त्याला पकडण्यात आले होते.



मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील एका सफाई कर्मचाऱ्याने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. या सफाई कामगाराला पाठदुखीचा त्रास आहे. कुर्ला येथील एल वॉर्ड मध्ये तो रस्ते झाडण्याचे काम करतो. पाठदुखीवर तो नायर रुग्णालयात तो उपचार घेत आहे. डॉक्टरांनी त्याला शस्त्रक्रियेचा सल्ला दिला आहे.

लाच मागण्यासाठी अशी ऑफर...

त्यामुळे तक्रारदार कामगाराने १६ सप्टेंबरला एल वॉर्ड येथील कनिष्ठ पर्यवेक्षक सुरेश मारुती सुरकुळे यांची भेट येवून त्यांना पाठदुखीचा त्रास असल्याचे सांगितले. तसेच आपल्यासोबत दुसरा एक कामगार देण्याची व ठराविक रोड देण्याबाबत विनंती केली. तेव्हा सुरकुळे म्हणाले की, दर महिन्याला ७,००० रुपये दे आणि घरी बसून नोकरी कर किंवा एकदाच १५,००० रुपये दे आणि फिक्स रोड घे असे सांगून लाचेची मागणी केली. त्यावर यां सफाई कामगारांने १९ सप्टेंबरला वरळी येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. एसीबीने तक्रारीची चौकशी करून सापळा रचला आणि सुरेश सुरकुळे यांना ८ हजार रुपयांची लाच स्वीकारताना शुक्रवारी २० सप्टेंबर संध्याकाळी पकडले. या प्रकरणी सुरेश सुरकुळे यांच्यावर भ्रष्टाचार निवारण कायदा १९८८ च्या कलम ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वतःच्या आजारी कर्मचाऱ्यांकडून लाच घेण्याचा प्रकार उघड झाल्याने पालिकेच्या घनकचरा विभागात भ्रष्टाचार किती बोकाळला आहे त्याचीच प्रचिती आली आहे.

ही कारवाई अतिरिक्त पोलिस अधीक्षक संदीप दिवाण, अतिरिक्त पोलिस उपअधीक्षक अनिल घेरडीकर, सहाय्यक पोलिस उपायुक्त राजेंद्र सांगळे, सहाय्यक पोलिस उपायुक्त अजित सुले आणि पोलिस निरीक्षक मोहन जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

नागरिकांना आवाहन...

दरम्यान, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असा अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन लाचलुचपतप्रतिबंधक विभाग आणि बृहन्मुंबई विभागाने केले आहे.

तक्रार करण्यासाठी..

संपर्कः लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.

टोलफ्री क्र. १०६४
दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२
फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
व्हॉट्सअप क्र. ८८२८२४१०६४

# टँकरच्या चाकाखाली येऊन दुचाकीस्वाराचा मृत्यू

**■विरार। प्रतिनिधीः**

विरार पूर्वेच्या चंदनसार परिसरात टँकरच्या चाकाखाली येऊन एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला आहे. सोमवारी सकाळी ११ च्या सुमारास ही घटना घडली. प्रताप नाईक (५५) असे या अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. ते विरार येथील रहिवासी होते. घटस्थापनेसाठी देवीची मूर्ती आणण्यासाठी जात असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला आहे. सोमवारी नवरात्रीचा पहिला दिवस असल्याने प्रताप नाईक हे देवीची मूर्ती आणण्यासाठी जात होते. रस्त्यात असर्णाया खड्ड्यात त्यांच्या दुचाकीचे चाक अडकल्याने ते दुचाकीसह खाली पडले. यावेळी मागून येर्णाया टँकरचे चाक त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा अपघाती मृत्यू झाला. या अपघातानंतर चंदनसार परिसरात काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. हा रस्ता मुंबई -अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा असल्याने या रस्त्यावर प्रचंड वर्दळ असते यामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. रस्ते दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले जात असल्याने ही घटना घडली असल्याचा आरोप नागरिकांनी यावेळी केला. काही संतप्त झालेल्या नागरिकांनी रास्ता रोको करून घटनेचा निषेध व्यक्त केला.

# चौपाट्यांवर बुडणाऱ्यांना आता वाचवणार रोबो; रोबोटिक वॉटर रेस्क्यू यंत्र खरेदीसाठी महापालिकेने काढली निविदा

**■मुंबई। प्रतिनिधीः**

बुडण्याच्या मुंबईतील चौपाट्यांवर घटना रोखण्यासाठी जीवरक्षकांवर अवलंबून राहावे लागते; परंतु आता त्यांच्या जोडीला 'रोबोटिक वॉटर रेस्क्यू' यंत्र येणार आहे. यासाठी मुंबई महापालिकेच्या अग्निशमन दलाकडून निविदा काढण्यात आली आहे.



मुंबईतील सहा चौपाट्यांवर प्रत्येकी एक रोबो जीवरक्षकाची भूमिका बजावणार आहे. या आधी निविदेत तुर्की तंत्रज्ञानावर आधारित बोटींचा समावेश असल्याने विरोध झाला होता. त्यामुळे आता भारतीय बनावटीच्या बोटींचा उल्लेख प्रक्रियेत करण्यात आला आहे.

सध्या मुंबई महापालिकेच्या अखत्यारित गिरगाव चौपाटी, दादर शिवाजी पार्क, जुहू, वसोर्वा, अक्सा आणि गोराई चौपाटी येते. त्या ठिकाणी १११ जीवरक्षक तैनात आहेत. मात्र, अनेकदा समुद्र किनारी येणारे पर्यटक त्यांच्या सूचनांचे पालन करत नाहीत. त्यामुळे ते बुडल्याच्या घटना घडल्या आहेत.

सहा चौपाट्यांवर सहा रोबो

जीवरक्षकांना 'रोबोटिक वॉटर रेस्क्यू'ची मदत देण्याचा निर्णय पालिकेने घेतला असून, सहा रोबोट सहा चौपाट्यांवर तैनात असतील. यासाठी पालिकेने निविदा काढली होती.

यावेळी भारत-पाकिस्तान संघर्षांदरम्यान पाकला मदत करणाऱ्या तुर्कीवर अनेक स्तरावर बहिष्कार टाकण्यात येत असल्याने पालिकेकडून तुर्की बनावटीच्या यंत्रखरेदीवर टीका झाली. त्यामुळे ते कंत्राट रद्द करून आता नव्याने प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

समुद्रात प्रतितास १८ किमी वेगाने पोहण्याची क्षमता

समुद्रात एखादी व्यक्ती बुडत असेल, तर रिमोटद्वारे हा रोबोट त्या व्यक्तीपर्यंत पाठवला जाईल आणि त्याच्या मदतीने बुडणाऱ्या व्यक्तीला समुद्र किनाऱ्यापर्यंत सुरक्षितरीत्या बाहेर आणले जाईल. त्यामुळेच त्याची वहन क्षमता ही जास्त आहे. समुद्रात प्रतितास १८ किमी वेगाने हा रोबोट पोहोचू शकतो, तसेच साधारण ८०० मीटर आणि त्यापेक्षा जास्त लांब तो जाऊ शकतो. तो एक तास कार्यरत राहू शकतो. त्याला पुन्हा चार्ज करता येते.

# डिसेंबरपर्यंत मुंबईत स्वयंचलित दरवाजांच्या नॉन एसी लोकल धावणार; रेल्वेमंत्र्यांची माहिती

**■मुंबई। प्रतिनिधीः**

मुंबईत पहिली स्वयंचलित दरवाजांची नॉन-एसी लोकल डिसेंबरपर्यंत येणार आहे. अपघातांमुळे दरवर्षी अनेक प्रवासी मृत्युमुखी पडत असल्याने सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अशा लोकल धावणार आहेत. भविष्यात मुंबईतील सर्व लोकल टप्प्याटप्प्याने स्वयंचलित दरवाजाच्या असतील, अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. बुलेट ट्रेनच्या घणसोली येथे शनिवारी झालेल्या कार्यक्रम स्थळी ते माध्यमांशी बोलत होते.



मुंब्रा येथे झालेल्या अपघातानंतर स्वयंचलित नॉन एसी लोकलच्या प्रकल्पाला गती मिळाली. रेट्रोफिटिंग तंत्रज्ञानाद्वारे गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवणे, बंद-दरवाजांच्या डिझाइनचा वापर करून नवीन नॉन-एसी ट्रेन तयार करणे, तसेच एसी लोकल नैसर्गिकरीत्या बंद-दरवाजांच्या असतील. अधिकाऱ्यांच्या मते, गर्दीच्या वेळी एक लोकलमधून ४ हजारहून अधिक जण प्रवास करू शकतील, तर तिची क्षमता फक्त अडीच ते तीन हजार प्रवासी असते. अशा परिस्थितीत, बंद दरवाजे अपघात रोखू शकतात.

मुंबईत लोकल गाड्या १२ डब्यांच्या धावतात. त्यापैकी फक्त काही १५ डब्यांच्या आहेत. नवीन निविदेत १५ डब्यांच्या मोठ्या संख्येने गाड्यांचा समावेश आहे, ज्यामध्ये भविष्यात १८ डब्यांच्या लोकलवर भर देण्याची तरतूद आहे. यामुळे प्रवाशांची गर्दी कमी होईल, असे अधिकाऱ्याने सांगितले.


वंदे मेट्रो कोच या मेट्रोचा चेहरामोहरा बदलतील

मुंबई रेल्वे विकास महामंडळाने अलीकडेच २,८५६ वंदे मेट्रो कोच खरेदीसाठी ई-निविदा जारी केली. या कोचची देखभालदेखील दीर्घकालीन कराराखाली केली जाईल. या कोचमध्ये मेट्रोसारखी वैशिष्ट्ये असतील. बंद दरवाजे, सुधारित वायुविजन, आरामदायी आसन व्यवस्था आणि सुरक्षेसाठी नवीन तंत्रज्ञान ही वैशिष्ट्ये आहेत.

# महिला पोलिसाचे अजब कृत्य; तरुणीवर नेमफ्लेट फेकून मारली

**■नाशिक। प्रतिनिधीः**

सर्वसामान्य नागरिकांशी पोलीस उर्मटपणे वागत असल्याचा अनुभव अनेकदा येतो. असाच एक प्रकार मुंबईच्या व्ही पी मार्ग पोलीस ठाण्यात उघडकीस आला आहे. एका प्रकरणात तक्रार करण्यासाठी गेलेल्या तरूणांची तक्रार दाखल करून न घेता उलट पोलिसांनी त्यांनाच दमदाटी केली. यावेळी एका महिला पोलिसाने आपल्या गणवेषावरील नेमप्लेट काढून तरूणीच्या चेह-यावर फेकून मारली. सुदैवाने तिचा डोळा वाचला आहे. या तरूणांनी पोलिसांच्या मुजोरपणाचा सर्व प्रकार आपल्या मोबाईलमध्ये कैद केला असून सध्या ही चित्रफित समाजमाध्यमवर व्हायरल होत आहे. अखेर पोलीस उपायुक्तांनी या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.



नेमके प्रकरण काय?

यश कारंडे हा तरूण व्यायाम प्रशिक्षक (फिटनेस ट्रेनर) आहे. एका व्यवहाराचे पैसे घेण्यासाठी तो खेतवाडी येथील ड्रीम व्हेवर्स च्या कार्यालयात गेला होता. मात्र त्या मालकाने कारंडे आणि त्याचा मित्र जयेश याला धक्काबुक्की करत मारहाण केली. या प्रकरणाची तक्रार करण्यासाठी यश कारंडे आपल्या सहकार्यांसह व्ही पी रोड पोलीस ठाण्यात गेला. आपली तक्रार घेऊन न्याय देतील असे त्याला वाटले पण घडले भलतेच..

पोलीस ठाण्यात काय घडलं?


पोलिसांनी तक्रार न घेता वरिष्ठ येतील तेव्हा यायला सांगितलं. दुसरीकडे ज्यांच्याविरोधात तक्रार द्यायला गेले त्यांना खास वागणूक देण्यात येत होती. पोलीस यश आण आणि त्याच्या मित्रांना दमदाटी करत होते. यामुळे यशने आपल्या मोबाईलने चित्रिकरण सुरू केले. आमची तक्रार घ्या असे ते पोलिसांना सांगत होते. मात्र पोलीस त्यांचे एकून घेत नव्हते. यामुळे तरूण संतप्त झाले.

पोलीस आणि तरूणांमधील वाद वाढला. यावेळी महिला पोलीस उपनिरीक्षकांचा संयम सुटला आणि त्यांनी आपल्या गणवेषावर लावलेली नेमप्लेट काढून तरुणीच्या चेहऱ्यावर फेकली. सुदैवाने तिचा डोळा वाचला. पोलिसांची ही कृती म्हणजे निव्वळ दादागिरी आणि मुजोरपणा आहे, असे यशने म्हटले आहे. याप्रकरणी कडक कारवाई करावी, मारहाण करणार्या महिला पोलीस उपनिरीक्षक यांना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी त्याने केली आहे.

सहाय्यक पोलीस आयुक्तांकडे चौकशी

यश कारंडे यांने पोलिसांच्या अरेरावीची चित्रफित आपल्या फेसबुक आणि इन्स्टाग्राम खात्यावर पोस्ट केली आहे. ही चित्रफित व्हायरल होत असून पोलिसांच्या दादागिरीविरोधात संताप व्यक्त होत आहे. अखेर या प्रकरणाची दखल घेत पोलीस उपायुक्त मोहीत गर्ग यांनी या प्रकरणाची चौकशी सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर वाघ यांच्याकडे सोपवली आहे. सोमवारपासून ही चौकशी केली जाणार आहे.

# कुळगाव-बदलापूरची झाली बजबजपुरी, हायकोर्ट संतापले; नवी मुंबईसारखे मॉडेल टाऊन बनवण्यासाठी समिती



**■मुंबई। प्रतिनिधीः**

कुळगाव-बदलापूरमध्ये मलनिःसारण व्यवस्था आणि सांडपाण्याचे कुठल्याही प्रकारचे नियोजन दिसत नसल्यामुळे या परिसराची अक्षरशः बजबजपुरी झाली असून या असुविधांमुळे नागरिकांची प्रचंड दुर्दशा झाली आहे, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच कुळगाव-बदलापूरला नवी मुंबईसारखे मॉडेल टाऊन बनवण्याच्या दृष्टीने ह्यव्यवस्थित शहरी विकासासाठी मार्गदर्शनह्ण देण्यासाठी एक सुधारणा समिती स्थापन केली. कुळगाव-बदलापूर नगर परिषदेने नगररचनेसाठी आवश्यक बाबींची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. नगर परिषद परिसराची सध्याची दुर्दशा लक्षात घेता, योग्य नियोजन करणे हे नगर परिषदेच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाबाहेर आहे. त्यामुळे तज्ज्ञांचे पॅनल नियुक्त करणे गरजेचे असल्याचे मत उच्च न्यायालयाने व्यक्त केले. नवी मुंबईसारख्या सुनियोजित शहरासारखे कुळगाव-बदलापूर मॉडेल टाऊन बनविण्यासाठी सार्वजनिक हिताकरिता स्थापन करण्यात आलेली समिती तत्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा तयार करेल, असे न्या. गिरीश कुलकर्णी व न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

समितीमध्ये नगररचना क्षेत्रातील तज्ज्ञ तसेच राज्य नगररचनाकार संचालकांनी नामांकित केलेल्या तज्ज्ञांचा समितीमध्ये समावेश असेल. त्याशिवाय ठाण्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी, कुळगाव-बदलापूर नगर परिषदेचे सीईओ, एमपीसीबीने शिफारस केलेले तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते, हेदेखील या समितीचा भाग असतील, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# जुन्या आग्रा महामार्गावर वाहनांचा वेग कासवगतीन



**■मुंबई। प्रतिनिधीः**


मुंबई आणि ठाण्याला जोडणारा जुना आग्रा रोड म्हणजे एलबीएस मार्ग सायनपासून घाटकोपर येथील सर्वोदय परिसरापर्यंत कायमच कोंडीत असतो. गर्दीच्या वेळी काही मिनिटांच्या अंतरासाठी अर्धा ते पाऊण तास लागतो, अशी स्थिती आहे. एलबीएस मार्गावर नारायणनगर, चिराग नगर परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूला अवजड वाहने, रिक्षांची अनधिकृत पार्किंग असते. त्यामुळे चालण्यास जागा शिल्लक राहत नाही. कमानी सिग्नलवर वाहतूक चौकी असूनही, कायमच हा परिसर कोंडीत अडकून पडलेला असतो. कमानी ते बैलबाजार पोलिस चौकीपर्यंतच्या मार्गावर उलट्या दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे काजूपाडा जोड रस्त्यावर मध्यरात्री १२.३० वाजताही कोंडी असते. मगन नथुराम रस्त्यावर भरबाजारात अवजड वाहने उभी असल्याने रस्ता अरुंद होतो आणि कोंडी असते.

सांताक्रूझ चेंबूर पुलाखाली वाहतूक पोलिस चौकी असूनही बेशिस्त वाहनचालकांना आळा बसत नाही. दरम्यान, मायकल शाळेपासून कमानी सिग्नलपर्यंत मायकल शाळेच्या बससोबतच अवजड वाहने उभी असतात. त्यामुळे शाळा सुटताना आणि भरताना मोठी कोंडी होते. कुर्ला डेपोपासून कल्पना सिनेमापर्यंत फुटपाथवर भंगार विक्रेत्यांनी कब्जा केला असून, फुटपाथवरही त्यांची कामे सुरू असतात.

# रस्ता सुरक्षा अन् अपघात रोखण्यासाठी ऑनलाइन लर्निंग लायसन्स चाचणी तात्पुरती बंद करणार; परिवहनमंत्र्यांचे एनआयसीला पत्र

**■मुंबई। प्रतिनिधीः**

वाहन चालवण्यासाठी आवश्यक असलेली ऑनलाईन लर्निंग लायसन्स चाचणी तात्पुरती बंद करण्यात येणार आहे. फील्ड अधिकाऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष तपासणीत फेसलेस लर्निंग लायसन्स प्रणालीमध्ये अनेक गंभीर त्रुटी आढळल्या आहेत. एनआयसी अर्थात नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटरच्या सुरक्षा सॉफ्टवेअरला बगल देऊन उमेदवाराशिवाय लर्निंग लायसन्स चाचणी देणे आणि उत्तीर्ण होणे शक्य असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. हे लक्षात घेऊन या प्रणालीत सुधारणा होईपर्यंत ऑनलाइन लर्निंग लायसन्स चाचणी तात्पुरती बंद करण्यासाठी परिवहन विभागाला पत्र लिहिल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.




ऑनलाईन लर्निंग लायसन्समध्ये जन्मतारीख, पत्ता, उमेदवाराचे नाव इत्यादी माहितीमध्ये फेरफार करता येतो. तसेच प्रत्यक्ष चाचणी न देता किंवा उमेदवार उपस्थित नसतानाही लर्निंग लायसन्स मिळविण्यासाठी चाचणी देणे आणि ती उत्तीर्ण होणे शक्य आहे. अशा अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या. या पार्श्वभूमीवर याप्रकरणी आज परिवहनमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली.

पक्क्या लायसन्ससारखा होतोय वापर

वयाची १८ वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर मोठ्या संख्येने तरुण ऑनलाईन लर्निंग लायसन्स काढतात. याचा वापर त्यांच्याकडून पक्क्या लायसन्सप्रमाणे केला जात असून त्यांच्याकडून बेदरकारपणे वाहन चालवले जात असल्याने गंभीर अपघात घडतात.

थर्ड पार्टीमार्फत लर्निंग लायसन्स?

इतर काही राज्यांनी थर्ड पार्टीमार्फत फेसलेस लर्निंग लायसन्स चाचण्या घेण्याची पद्धत अवलंबली आहे. महाराष्ट्रात अशी पद्धत राबवता येईल का? याचीच चाचपणी करण्यात येणार आहे. त्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

केरळ, तेलंगणा, झारखंड, उत्तराखंड, त्रिपुरा, मेघालय, नागालँड, लडाख, लक्षद्वीप अशा राज्यांसह केंद्रशासित प्रदेशांमध्ये आरटीओ कार्यालयामार्फतच परीक्षा द्यावी लागते.

ही पद्धत किती व्यवहार्य आणि सुरक्षित आहे, याचीही चाचपणी करण्यात येणार असून त्यासाठी राज्य शासनाने तज्ज्ञ समितीमार्फत या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल मागविला आहे. समितीच्या शिफारशींवर आधारित सुधारणा लवकरात लवकर करण्यात याव्यात, असे निर्देशही सरनाईक यांनी दिले आहेत.

# गावी जाण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्यानं पत्नीची हत्या



**■मुंबई। प्रतिनिधीः**

मुंबईतील कांदिवली येथील चारकोप परिसरात पत्नीची गळा आवळून हत्या केल्याप्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आली. आरोपी मूळचा ओडिशामधील रहिवाशी असून त्याने पत्नीकडे गावी जाण्यासाठी पैसे मागितले. परंतु, पत्नीने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर संतापलेल्या आरोपीने तिचा गळा आवळून हत्या केली, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली. याप्रकरणी पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दासा राणा (वय, ४१) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. राणा मूळचा ओडिशातील रहिवाशी असून तो त्याची पत्नी हिमंद्री हिच्यासोबत कांदिवलीतील चारकोप येथील एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत कामगार म्हणून काम करायचा. दोघेही गेल्या एक वषार्पासून आपल्या मुलासह याच इमारतीत राहत होते. शनिवारी दुपारी २:३० च्या सुमारास राणा आणि हिमंद्री यांच्यात पैशावरून भांडण सुरु झाले. राणाला त्याच्या गावी जाण्यासाठी पैसे हवे होते. परंतु, हिमंद्रीने त्याला पैसे देण्यास नकार दिला, ज्यामुळे त्यांच्यात कडाक्याचे भांडण झाले. राणाने रागाच्या भरात प्रथम तिला मारहाण केली आणि नंतर बेडशीटने तिचा गळा दाबून तिची हत्या केली. ही घटना घडली, तेव्हा राणाचा मुलगाही तिथे उपस्थित होता. मोठा आवाज ऐकून इतर कामगार जमले आणि त्यांनी राणाचा दरवाजा ठोठावला. राणाने दार उघडल्यानंतर कामगारांना हिमाद्री बेशुद्धावस्थेत आढळली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com